६६९/-

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२३/प्र.क्र. २८८/बैठक/३० नोव्हेंबर/२०२३/५९९२ दिनांक : 21 DEC 2023

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **७४व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे प्रतिनिधी (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ३) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

तसेच डॉ. गोविंद रे. संगवई, प्र. उपसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व वैद्य जातवेद ज. पवार, प्रतिनिधी, आयुष संचालनालय, मुंबई हे निमंत्रित संबंधित संचालकांच्या वतीने प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

विषय क्रमांक १: प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३/१०/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७३व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३/१०/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७३व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले. सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक २: प्राधिकरणाच्या क्रमांक ७३व्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३/१०/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७३व्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | १ | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३/१०/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७३व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत | प्राधिकरणाच्या दिनांक ०३/१०/२०२३ रोजी झालेल्या ७३ व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक ३१/१०/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |
| २. | २(२) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तांवावर निर्णय घेण्याबाबत.<br>*निर्देश : प्राधिकरणाच्या निर्देशानुसार प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. याबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्यात येईल.* | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार संबंधित महाविद्यालयांची प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात आली आहेत. |
| ३. | ४(क) | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तांवावर निर्णय घेण्याबाबत | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. |
| ४. | ४(ख) | एस.व्ही.एस.एस. कॉलेज ऑफ फिजीओथेरेपी, लातुर यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदवी भौतिकोपचार अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जायेभाये शिवकन्या शिवाजीराव यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक ७७१८/२०२३ मधील दिनांक १५/०९/२०२३ रोजीचे न्यायालयीन प्रकरण | प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक ३१/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहेत. |

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरण कार्यालयाद्वारे केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेऊन मान्य करण्यात आला.

विषय क्रमांक ३: महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५)(४) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा व तदनुषंगाने घेतलेल्या निर्णयाचा आढावा.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील काही व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु आहेत. या संदर्भात अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

सदरील प्रक्रिये दरम्यान हितसंबंधित घट कांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व तद्नुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केला (प्रपत्र-अ). याबाबत परीक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक, वैद्यकीय शिक्षण विभाग, सीईटी कक्ष यांनी अभ्यासक्रम-निहाय आढावा सादर केला व त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली, याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विभाग | एकुण तक्रारी | संबंधित परिक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय / आयुष शिक्षण | ०६ | श्री. सिध्देश नर. |
| | एकुण | ०६ | |

उक्त नमूद प्रपत्र-अ मधील अ.क्र. १ ते ६ मधील तक्रारींवर परिक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर सादरीकरण करुन त्यावर सांगोपांग चर्चा झाली. प्रस्तूत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाची प्रवेश परिक्षा शासनाद्वारे वेळोवेळी पारीत करण्यात आलेल्या निर्देशानुसार करण्यात आली असल्याचे आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केले.

उक्त तालिकेतील अ.क्र १ ते ५ तक्रांरीसंबंधी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त करण्याचे निर्देश दिले, सदर प्रकरणी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई व संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना अर्धशासकीय पत्राद्वारे कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

प्रस्तूत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर आरोग्य विज्ञान / आयुष अभ्याक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान ज्या महाविद्यालयांविरुदध तक्रारी अथवा गैरप्रकार / निष्काळजीपणा झाल्याचे निर्दशनास आले आहे, अशा महाविद्यालयांची प्राधिकरण स्तरावरुन तपासणी / छाननी प्रक्रियेकरिता गठित करण्यात आलेल्या उपसमितीद्वारे सखोल छाननी/पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या सेवाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना सीईटी कक्षाकडून अर्धशासकीय पत्राद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश प्रकरणी वस्तूनिष्ट अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात यावे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या सामाईक प्रवेश परिक्षेबाबतचे अंदाजित वेळापत्रक सादर करण्याच्या सुचना सर्व संबंधित परिक्षा समन्वयक यांना देण्यात आल्या.

**विषय क्रमांक ४: महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १७ मधील तरतूदींनुसार प्राधिकरण व सीईटी कक्षाचे लेखे अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर.**

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरण व सीईटी कक्षाचे लेखे सादर केले, याबाबत नोंद घेण्यात आली. तसेच करण्यात आलेल्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात आली.

(ज. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक ...
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक ५: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी करण्यात आलेल्या ०४ महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी उपसमितीचा दिनांक ८/११/२०२३ रोजीचा अहवाल प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता सादर.

विषयांकित प्रकरणी खालील ०४ महाविद्यालये प्राधिकरण स्तरावरील १% निवडक पध्दतीने करण्यात येणाऱ्या पडताळणी प्रक्रियेस कार्यालयाच्या वेळापत्रकानुसार गैरहजर होती. संबंधितांना सदरील १% पडताळणीसाठी पुनश्च संधी देण्याबाबत प्राधिकरणाचे निर्देश होते. दरम्यान या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर केले होते. सदर प्रवेश मान्यता प्रस्तावांबाबत प्राधिकरणाने खालील यादीतील महाविद्यालयांच्या नावासमोरील दिनांकास प्राधिकरण बैठीकीमध्ये १% पडताळणी अहवालास अधिन राहुन सदरील प्रवेशांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| Sr. No. | Course | College Code | Name of the College | ARA Meeting date | No. of admissions approved |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1. | DSE | 5107 | Shri Gulabrao Deokar College of Engineering, Jalgaon | 28/03/2023 | 37 |
| 2. | DSP | 6379 | Charak College of Pharmacy & Research, Wagholi, Pune | 28/03/2023 | 12 |
| 3. | LLB-5 | 14005 | Dr. Babasaheb Ambedkar College of Law, Bhandara | 27/04/2023 | 39 |
| 4. | BAMS | 3123 | Dr. V. Patil FS Ayurvedic College, Shevgaon, Ahmednagar | 01/06/2023 | 49 |

उक्त नमूद ०४ महाविद्यालयांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची दिनांक ६/११/२०२३ व ७/११/२०२३ रोजी १% प्रवेश पडताळणी प्रक्रिया उपसमिती स्तरावर करण्यात असून या संदर्भात उपसमितीचा अहवाल प्राधिकरणा समोर सादर करण्यात आला (प्रपत्र-ब). सदर अहवालास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार वरील महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाचे मान्यता पत्र निर्गमित करण्यात यावे.

विषय क्रमांक ६: महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ४, ९ व १० नुसार शैक्षणिक वर्षाच्या सामाईक प्रवेश परीक्षा / केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया / प्राधिकरणाकडील प्रवेश मान्यतेची प्रक्रिया / प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा तपशील / पुनर्विलोकन याचिका अर्जाची प्रक्रिया याकरिता ऑनलाईन / ऑफलाईन (सध्या अस्तित्वात असलेली व प्रस्तावित पध्दतीने) राबविण्यात आलेल्या प्रक्रियेचा आढावा अवलोकनार्थ सादर.

प्रस्तूत प्रकरणी अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार सामाईक प्रवेश परीक्षा / केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया / प्राधिकरणाकडील प्रवेश मान्यतेची प्रक्रिया / प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा तपशील / पुनर्विलोकन याचिका अर्जाची प्रक्रिया याकरिता ऑनलाईन / ऑफलाईन (सध्या अस्तित्वात असलेली व प्रस्तावित पध्दतीने) राबविण्यात आलेल्या प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला तसेच या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणाच्या सध्याच्या व प्रस्तावित कामकाजाबाबत सादर केलेल्या टिपणीची नोंद घेण्यात आली (प्रपत्र-क). सीईटी कक्षामधील घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेसाठीची व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची सध्याची व प्रस्तावित कार्यपध्दती प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक ७: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) शैक्षणिक २०२१-२२ मधील डॉ. तानाजीराव चोरगे अध्यापक महाविद्यालय (बी.एड), रत्नागिरी मधील ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत विद्यापीठास कळविलेले दिनांक १९/१०/२०२३ रोजीचे पत्र अवलोकनार्थ व मान्यतेबाबत.

डॉ.तानाजीराव चोरगे अध्यापक महाविद्यालय (बी.एड), रत्नागिरी महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील बी.एड अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थी पल्लवी चंद्रशेखर पाचेरकर व मनिष मनोहर गावडे यांची जात वैधता प्रमाणपत्राची त्रुटी दर्शविण्यात आली आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्था स्तरावरील प्रवेश फेरीमध्ये करण्यात आलेले आहेत.

उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दिनांक १८/०४/२०२३ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने संचालकांनी दिनांक ०४/०९/२०२३ रोजीच्या पत्रात उक्त विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र प्रवेश घेताना सादर न करता उशिराने सादर केले असुन सदर विद्यार्थ्यांचे प्रवेशास अंतिम मान्यता देण्याबाबतचे अधिकार प्रवेश नियामक प्राधिकरणास असुन सदर प्रकरणी प्राधिकरण स्तरावरुन उचित आदेश निर्गमित करण्याबाबत विनंती केली आहे.

तसेच कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सदर विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र उशिरा प्राप्त झाल्याचे महाविद्यालयाने शपथपत्रात नमुद केले आहे. तसेच सदर दोन्ही विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरीय फेरीमध्ये झाले आहेत. तरी महाविद्यालयाने सदर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता मिळण्याबाबत विनंती केली आहे.

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक १९/१०/२०२३ रोजीच्या पत्राचे नोंद घेण्यात आली. तसेच वरील वस्तूस्थिती विचारात घेता डॉ.तानाजीराव चोरगे अध्यापक महाविद्यालय (बी.एड), रत्नागिरी महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील बी.एड अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थी पल्लवी चंद्रशेखर पाचेरकर व मनिष मनोहर गावडे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत असल्याचा निर्णय घेण्यात आला.

(ख) रिझवी विधी महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विधी ३ वर्ष व विधी ५ वर्ष अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता मिळण्याबाबत.

रिझवी विधी महाविद्यालय, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विधी ३ व ५ वर्ष अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १८/०४/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे,-

"संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सादर केलेल्या माहितीनुसार महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव अधिनियम, २०१५ च्या तरतुदींनुसार विहित वेळेत सादर केलेले नाहीत. सबब सदर महाविद्यालयांनी रु.१ लाख दंड प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे भरणा करावा, संबंधित महाविद्यालयांनी दंडाच्या रकमेचा भरणा केल्याची खातरजमा करुन संचालक, उच्च शिक्षण

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

संचालनालय, पुणे यांनी त्यांचे प्रवेश पडताळणी करावी. संबंधित महाविद्यालयांकडुन रितसर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणासमोर मान्यतेस सादर करण्याचे निर्देश देण्यात आले."

प्राधिकरणाच्या उक्त निर्णयाच्या अनुषंगाने महाविद्यालयाने दंडाची रक्कम रु. १ लाख दिनांक ०३/०८/२०२२ रोजी भरणा केली आहे. त्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना दिनांक २९/०८/२०२२ रोजीच्या पत्राने उक्त महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांचा तपासणी अहवाल सादर करण्याचे कळविण्यात आले होते.

वरीलप्रमाणे मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या निर्णयाची पुर्तता पुर्ण करुन महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठीचा प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणाकडे दिनांक ०८/०९/२०२३ रोजी मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

या अनुषंगाने रिझवी विधी महाविद्यालय, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विधी ०३ व ०५ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या निर्णयानुसार पुर्तता पूर्ण केली आहे, सबब सदरील महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विधी ०३ वर्ष व ०५ वर्षे अभ्यासक्रमास अनुक्रमे प्रवेशित १७९ व १२० विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच महाविद्यालयाचे स्वतंत्र प्रवेश मान्यता पत्र निर्गमित करण्याबाबत उचित कार्यवाही त्वरीत करण्याचे निर्देश देण्यात आले.

(ग) <u>सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिरिंग, अंधेरी शासकिय अनुदानित महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीतील त्रुटीची पूर्तता प्रकरणी दंड माफ करणेबाबत.</u>

सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ प्रथम वर्ष अभियांत्रिकी ४३ व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते सुनावणी झालेली असून, सदरील प्रकरणी रुपये १ लाख प्रति अभ्यासक्रम प्रमाणे दंड आकारण्यात आला होता. या संदर्भात दंड माफ करण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी अभिप्राय सादर केले आहेत.

तथापि, शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या संदर्भात प्राधिकरणाच्या दि.११/०४/२०२२ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे,-

> "शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/ प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले असल्याने संबंधीत शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या मान्यतेची आवश्यकता नाही."

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

उपरोक्त संस्था ही अशासकीय अनुदानित संस्था असल्यामुळे प्रवेशाच्या मंजुरी प्रस्तावांना कोणत्याही प्रकारची कार्यवाही होणे अपेक्षित नसून अधिनियम २०१५ मध्ये तशी तरतूद नाही. सदर संस्था हि अशासकीय अनुदानित असल्याने महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २२/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची पडताळणी करण्यात येऊ नये व त्यांच्याकडून दंड न आकारण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाने दिनांक ०३/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केले आहे.

वरीब बाबी विचारात घेता सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई यांच्या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील त्रुटी असलेल्या ४३ व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील त्रुटी असलेल्या ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसाठी सुनावणी निर्णयान्वये सदर अशासकीय अनुदानित महाविद्यालयास १ लाख प्रती अभ्यासक्रम आकारण्यात आलेला दंड माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(घ) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयांनी सादर केलेल्या उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व इतर संचालनालकांच्या फेरपडताळणी अहवालानुसार पात्र प्रवेशांना मान्यता देण्याबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास त्रुटींमुळे प्रलंबित असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संबंधित संचालकांनी फेरपडताळणी करुन सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करण्यात आले. या संदर्भात पुर्नविलोकन अर्ज-निहाय प्रकरणे मान्यतेसाठी सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

(ङ) <u>मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट विधी महाविद्यालय, नवी मुंबई या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी ३ वर्ष व विधी ५ वर्ष अभ्यासक्रमाचे प्रवेश मान्यता प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत.</u>

मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट विधी महाविद्यालय, नवी मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी ३ वर्ष व विधी ५ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी खालील प्रमाणे प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केले आहेत,-

| अ. क्र. | कोड | शैक्षणिक वर्ष | अभ्यासक्रम | भरणा केलेले प्रक्रिया शुल्क | प्रवेश प्रस्ताव सादर केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | LLB३०३६ | २०१७-१८ | विधी - ३ (वर्षे) | रु. ४४०००/- | ३१/१०/२०२३ |
| २. | LLB५०४५ | २०१७-१८ | विधी - ५ (वर्षे) | रु. ३८,४००/- | ३१/१०/२०२३ |

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठीचे प्रक्रिया शुल्क आकारण्याबाबत प्राधिकरणाचे दिनांक २/१२/२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार उपरोक्त महाविद्यालयाने प्रक्रिया शुल्काचा भरणा केला आहे.

संबंधित महाविद्यालयाने अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक विधी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आवश्यक प्रस्ताव विहित

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

कालावधीमध्ये सादर केला नसल्याची बाब स्पष्ट आहे. तथापि प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट विधी महाविद्यालय, नवी मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रस्तूत प्रकरणी 'प्रवेश मान्यता प्रस्ताव' सादर करण्याबाबत महाविद्यालयाकडून झालेल्या दिरंगाई/निष्काळजीपणा ही गंभीर बाब विचारात घेता संबंधित महाविद्यालयास प्रति अभ्यासक्रम/प्रस्ताव रु. ५ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT द्वारे भरणा करण्यात यावा.

तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(च) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण/आयुष शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संबंधित संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर तंत्र शिक्षण, उच्च शिक्षण व आयुष शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले व या संदर्भात प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले,-

२) प्रस्तूत प्रकरणी संबंधित संचालकांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, तथापि या प्रकरणी 'प्रवेश मान्यता प्रस्ताव' सादर करण्याबाबत महाविद्यालयांकडून झालेल्या दिरंगाई/निष्काळजीपणा बाबत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील महाविद्यालयांना प्रत्येकी रु. २ लाख व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील महाविद्यालयांना प्रत्येकी रु. १ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरील संचालनालय/अभ्यासक्रम-निहाय <u>(प्रपत्र-ड/महाविद्यालय-निहाय )</u> प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे सर्व संबंधितांना बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी. याबाबतचा अभ्यासक्रम-निहाय गोषवारा खालील प्रमाणे आहे,-

शैक्षणिक वर्ष २०२१-२२

| अ. क्र. | अभ्यासक्रम | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1. | B. Engineering / B.Tech | 01 |
| 2. | B. Pharmacy | 01 |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र

| अ. क्र. | अभ्यासक्रम | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 3. | MBA / MMS | 01 |
| 4. | MCA | 01 |
| 5. | DSE (Direct Second Year Degree Engineering) | 01 |
| 6. | B.Ed. | 02 |
| 7. | B.P.Ed. | 01 |
| | **Total :** | **08** |

शैक्षणिक वर्ष २०२२-२३

| अ. क्र. | अभ्यासक्रम | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| | **Technical Education** | |
| 1. | B. Engineering / B.Tech | 01 |
| 2. | B. Pharmacy | 13 |
| 3. | Pharm. D | 02 |
| 4. | M. Engineering / M. Tech. | 01 |
| 5. | M. Pharmacy | 02 |
| 6. | Pharm D. (PB) | 02 |
| 7. | MBA/MMS | 07 |
| 8. | MCA | 01 |
| 9. | DSE (Direct Second Year Degree Engineering) | 01 |
| 10. | DSP (Direct Second Year Degree Pharmacy) | 10 |
| | **Total (A) :** | **40** |
| | **Higher Education** | |
| 11. | LLB-3 Yrs | 04 |
| 12. | LIB-5 Yrs (Integrated) | 02 |
| 13. | M.Ed. | 01 |
| 14. | B.Ed. | 09 |
| 15. | B.Ed./M.Ed. (Integrated) | 01 |
| 16. | B.P.Ed. | 01 |
| | **Total (B) :** | **18** |
| | **AYUSH Education** | |
| 17. | PGA | 01 |
| 18. | BAMS | 01 |
| | **Total (C) :** | **02** |
| | **Total (A+B+C):** | **60** |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

४) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

५) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे (प्रपत्र-ड), अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नुसार) कार्यवाही करावी.

(छ) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी (१) अनिवासी भारतीय (एनआरआय) /संस्था स्तरावरील अनिवासी भारतीय कोटयातील रिक्त जांगावर व (२) व्यवस्थापन संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नसल्याने संबंधित विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत निकाल राखुन ठेवण्यात आले असल्याची बाब निर्दशनास आली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, ही बाब विचारात घेता तसेच महाविद्यालयांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने प्रवेशित जे विद्यार्थी पात्रतेचे निकष पूर्ण करीत आहेत, अशा विद्यार्थ्यांना प्राधिकरणाचा मान्यतेस अधीन राहून परिक्षेचे निकाल जाहिर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १८/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना कळविण्यात आले आहे. सदरील पत्राची नोंद घेण्यात आली.

(ज) <u>MAHA DBT साठी API तयार करण्याबाबत.</u>

विषयांकित प्रकरणी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक १७/११/२०२३ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी सविस्तर माहितीसह प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

(झ) <u>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना सामाईक प्रवेश परीक्षांच्या वॉर रुमचे मानधन, केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियांचे मानधन तसेच दिवाळी सानुग्रह अदा करण्याबाबत अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर.</u>

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना सामाईक प्रवेश परीक्षांच्या वॉर रुमचे मानधन, केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियांचे मानधन तसेच दिवाळी सानुग्रह शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ करिता अदा करण्यात आले आहे.

(जे. पी. डांगे)
प्रवेश नि...

तथापि शैक्षणिक वर्ष २०२१-२२ (०४ अधिकारी /कर्मचारी वगळून) व २०२३-२४ च्या प्रक्रिये मधील वॉर रुमकरिता प्रवेश नियामक प्राधिकरणातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना अद्याप मानधन अदा करण्यात आलेले नाही.

वरील बाबी विचारात घेता या संदर्भात सादर केलेले प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले व त्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली, तसेच शैक्षणिक वर्ष (१) २०१९-२० मध्ये कार्यरत ज्या अधिकारी / कर्मचारी यांना वॉर-रुम व मानधन अदा केलेले नाही, (२) २०२१-२२ मधील कामकाजाकरिता प्राधिकरणातील ज्या अधिकारी/कर्मचारी यांना वॉर-रुम मानधन अदा केले नाही, अशा सर्व संबंधितांना आणि (३) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रक्रिये मधील वॉर रुमकरिता प्रवेश नियामक प्राधिकरणातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना मानधन अदा करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या संदर्भात आवश्यक कार्यवाही त्वरीत करुन त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच सदरील प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार डॉ. मंगेश निकम व श्री. सिध्देश नर, हे दोन्ही परिक्षा समन्वयक एका पेक्षा अधिक पदाचा कार्यभार तसेच सह संचालक पदाचे कामकाज संभाळत असल्याने त्यांना सहसंचालक पदाचे मूळ वेतन अधिक महागाई भत्ता देवून संबंधितांना मानधन लागु करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(ञ) <u>श्री.दिपक भातुसे, वाहनचालक यांच्या अनुपस्थितीत श्री. विलास तांबे, शिपाई यांना वाहनचालक या पदाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्याबाबत.</u>

विषयांकित प्रकरणी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले व सदरील प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यामध्ये वाहनचालक उपस्थित नसलेल्या दिनांकास वाहन चालकाचे काम केल्यास नियमानुसार अतिरिक्त वेतन अदा करण्यास प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

(ट) <u>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामध्ये उपस्थित राहणाऱ्या अभ्यागत यांचे मोबाईल रिसेप्शन येथे जमा करणेबाबत.</u>

विषयांकित प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक २३/११/२०२३ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या संदर्भात प्रस्तावित केल्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

(ठ) <u>गोदिंया होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, गोंदिया येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित कु. मिताली कारेमोरे यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.</u>

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित कु. मिताली कारेमोरे यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ, नागपुर येथे दखल याचिका क्रमांक ६०६४/२०२२ मधील दिनांक

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

२८/११/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशास अनुसरुन कु. मिताली कारेमोरे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या दिरंगाई/निष्काळजीपणा ही गंभीर बाब विचारात घेता संबंधित महाविद्यालयास रु. १५,०००/- दंड आकारण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये neft द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच दंडाची रक्कम विद्यार्थी / पालक यांच्याकडून वसूल करणार नाही, याबाबतचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील, नोंद घ्यावी.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

**(जे.पी. डांगे)** भा.प्र.से.
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.**

दिनांक : 21 DEC 2023